**प्रेस नोट** दिनांक १२/०३/२०२५

आरोपी लोकसेवक विठ्ठल पंढरी नागरगोजे, वय ४७ वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी सज्जा मानवत शहर, तहसील कार्यालय मानवत ता.मानवत जि.परभणी (वर्ग ३ महसलु विभाग), रा. माउली नगर, कारेगाव रोड, परभणी हे १०,०००/- रुपयांची लाचमागणी प्रकरणी ओरीबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे.मानवत जि.परभणी गुरनं ९१/२०२५ कलम ७ भ्र.प्र.अधि १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.१२/०३/२०२५ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | विठ्ठल पंढरी नागरगोजे, वय ४७ वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी सज्जा मानवत शहर, तहसील कार्यालय मानवत ता.मानवत जि.परभणी (वर्ग ३ महसलु विभाग) ), रा. माउली नगर, कारेगाव रोड, परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ११,०००/- रू. मागणी करून तडजोड अंती १०,०००/- रुपये |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे सासरे यांनी आदर्श पार्क मानवत येथे प्लॉट खरेदी केलेला आहे. त्या प्लॉटचे फेरफार करून सातबारा मध्ये नोंद घेण्याचे काम मानवत येथील ग्राम महसूल अधिकारी यांचे कडून करून घेण्याकरिता तक्रारदार यांना त्यांचे सासरे यांनी सांगितले आहे. दिनांक २०/०२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी त्यांचे सास-यांचे प्लॉटचे फेरफार करून सातबारा मध्ये नोंद होणे करिता प्लॉट खरेदी दस्ताची संचिका लोकसेवक विठ्ठल नागरगोजे यांना दिली. दस्त नोंदणी केल्यानंतर फेरफारसाठी खूप उशीर केला आहे त्यामुळे ११,००० रुपये द्यावे लागतील असे म्हणून लोकसेवक विठ्ठल नागरगोजे यांनी लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दि.०३/०३/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.

दि.०३/०३/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, तुमच्या खरेदी दस्तामध्ये त्रुटी आहे असे म्हणून लोकसेवक विठ्ठल पंढरी नागरगोजे यांनी तक्रारदार यांना सास-यानी खरेदी केलेल्या प्लॉटचा फेरफार करून सातबारा मध्ये नोंद घेऊन सातबारा उतारा देण्यासाठी ११,००० रू लाचेची मागणी पंचासमक्ष करून तडजोडीअंती १०,००० रुपये लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली आहे. दि.१२/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक विठ्ठल पंढरी नागरगोजे यांना संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून आरोपी लोकसेवक विठ्ठल पंढरी नागरगोजे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. दि.१२/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही मा.श्री.संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड, डॉ.संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक, श्री.बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, सपोउपनि निलपत्रेवार, पोह भुमकर,चाटे, पोशि बोथनकर,कदम, नागरगोजे,घुले चापोह कदम,नरवाडे लाप्रवि परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री.बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी. |




पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner